Email - Info@maharashtracrimetimes.com

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: ३६ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार ४ डिसेंबर २०१८ ते सोमवार १० डिसेंबर २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019

३ मुंबई ते दुबईपर्यंत पाण्याच्या खालून धावेल ट्रेन...

गोहत्येच्या संशयावरून उद्रेक, दोन ठार ४

# महाराष्ट्राचं मिनी काश्मीर गारठलं: पारा ९ अंशाखाली!

**सातारा (प्रकाश पवार)-** महाराष्ट्राचं मिनी काश्मीर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाबळेश्वरमध्ये थंडीचा कडाका वाढला आहे. सोमरावी पहाटे महाबळेश्वरचा पारा ९ अंशाखाली आला होता. हिवाळा सुरू झाल्यानंतर प्रथमच तापमानात एवढी घट झाल्यामुळे पर्यटकांची पावलं आता महाबळेश्वरकडे वळू लागली आहेत. हिवाळा सुरू झाल्यानंतर परभणी आणि अहमदनगर या दोन जिल्ह्यांत सर्वात कमी तापमानाची नोद होत असल्याची बातम्या आत्तापर्यत झळकत होत्या. त्यामुळे महाराष्ट्राच्या मिनी काश्मीरला यंदा झालंय तरी काय असा प्रश्न सर्वांना पडला होता. परभणी आणि अहमदनगर जिल्ह्याचा पारा १० अंशापर्यंत खाली आलेला असताना महाबळेश्वरचं तापमान १४ आणि १५ अंशाच्या जवळपास होतं.

पण, सोमवारी पहाटे महाबळेश्वरचं तापमान ९ अंशाच्या खाली आलं. यामुळे गुलाबी थंडीचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांची पावलं आता महाबळेश्वरच्या दिशेने वळायला लागली असल्याचं दिसून येत आहे. सोमवारी महाबळेश्वरातल्या वेण्णा लेक, लिंग मळा परिसरात पर्यटक गुलाबी थंडाचा आनंद लुटताना दिसून आले. तर दिवस कलंडताच महाबळेश्वमध्ये अनेक ठिकाणी शेकोट्या पेटायला सुरूवात झाली आहे.

पारा खाली घसरल्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटकांच्या स्वागतासाठी महाबळेश्वर सज्ज झालं आहे. येथे येणाऱ्या पर्यटकांच्या सुविधेसाठी हॉटेल, रिसॉर्ट्स व्यावसायीकांनी कंबर कसली आहे.



# मराठा आरक्षणाविरोधात हायकोर्टात याचिका दाखल

**मुंबई (विशाल कारंडे)- मराठा आरक्षणाच्या विरोधात मुंबई हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. राज्य सरकारने ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण जाहीर करणं हे राज्यघटनेविरोधात आहे, अशी भूमिका घेत अॅड. गुणरत्न सदावर्ते यांच्या वतीनं ही याचिका सादर करण्यात आली आहे. याआधी आघाडी सरकारनेही मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली होती.**

पण या आरक्षणाविरोधात कोर्टात याचिका दाखल झाल्याने त्याला स्थगिती मिळाली होती. आता फडणवीस सरकारने दिलेल्या मराठा आरक्षणाविरोधातही याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे हे आरक्षणही कायद्याच्या कचाट्यात अडकणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. आरक्षणाविरोधात याचिका दाखल होण्याची हीच शक्यता लक्षात घेऊन मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी हायकोर्टात कॅव्हेट दाखल केलं आहे. त्यामुळे आरक्षणाविरोधातील याचिकेवर निर्णय देण्या आधी कोर्टाला विनोद पाटील यांचंही म्हणणं ऐकून घ्यावं लागेल. दुसरीकडे, मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ राज्य सरकारनेही सुप्रीम कोर्टात कॅव्हेट दाखल केलं आहे. राज्य सरकारकडून मराठा आरक्षणाची घोषणा झाल्यानंतर या आरक्षणाविरोधात काही लोक कोर्टात जाण्याची शक्यता होती. हीच शक्यता लक्षात घेऊन मराठा आरक्षण टिकावं, यासाठी राज्य सरकारने हे पाऊल उचललं



आहे. मागासवर्ग आयोगाच्या अहवालानंतर राज्य सरकारने दोन्ही सभागृहात विधेयक संमत करत मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिलं आहे. पण या आरक्षणाविरोधात कोर्टात जाण्याची भूमिका काही जणांकडून घेण्यात येत आहे. लवकरच मराठा आरक्षणाविरोधात कोर्टात याचिका दाखल होण्याचीही शक्यता आहे.

दरम्यान, राज्यभरातील क्रांती मोर्च्यांद्वारे सरकारवर आणलेला दबाव आणि मागासवर्ग आयोगाचा अनुकूल अहवाल याद्वारे मराठा समाजाने आरक्षणाची लढाई जिंकली. राज्य सरकारनेही अत्यंत शिताफीनं मोठी कसरत करत मराठ्यांना नुकतीच स्वतंत्र आरक्षणाची घोषणा केली आहे.

मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय झाल्यानंतर राज्यातल्या आरक्षणाची मर्यादा आता ६८ टक्क्यांवर गेली आहे. तामिळनाडूनंतर एवढं आरक्षण देणारं महाराष्ट्र हे दुसरं राज्य आहे. राज्यघटनेनुसार आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांच्या वर नेता येत नाही. मात्र विशेष परिस्थितीत राज्य सरकार जास्त आरक्षण देण्याचा निर्णय घेऊ शकतात. तामिळनाडूच्या आरक्षणांचा प्रश्न हा अजूनही सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे.

# आरक्षणासाठी धनगर आक्रमक, महायुतीच्या वचननाम्याची होळी

**ठाणे (तृप्ती गोरे)-** मराठा समाजाला आरक्षण दिल्यानंतर आता धनगर समाजाच्या आरक्षणासाठी समाज आक्रमक झाला आहे. महाराज यशवंतराव होळकर यांच्या जयंतीच्या दिवशी धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी मुंबईत महायुतीच्या वचननाम्याची होळी केली. मुलुंड विभागात झालेल्या या आंदोलनाचे नेतृत्व भाजपचे खासदार पद्मश्री विकास महात्मे यांनी केले. धनगर समाजाच्या एस.टी आरक्षणाच्या धनगर जमातीच्या सर्व मागण्या प्रलंबित आहेत. महायुतीने २०१४ मध्ये निवडणुकीपूर्वी सत्ता आल्यावर धनगर समाजाला आरक्षण देऊ, असे आश्वासन दिले होते. अजूनही ते पूर्ण केले नाही. भाजपचा खासदार असलो तरी आधी मी धनगर आहे यासाठी हे आंदोलन आहे, असे खासदार महात्मे यावेळी म्हणाले. शासनाने धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये आरक्षणाची देण्याबाबत अंमलबजावणी करण्याचे आश्वासन २०१४ च्या निवडणुकीपूर्वी दिले होते. परंतु चार वर्षांपेक्षा



जास्त कालावधी लोटूनही अद्याप दिलेल्या आश्वासनाची पूर्तता युती शासनाने केली नाही. त्यामुळे आज यवतमाळमध्ये बसस्थानक चौकात धनगर समाजाच्या वतीने युतीच्या वचननाम्याची होळी करण्यात आली.

धनगर समाजाला आरक्षण देऊ, असे सांगितले जाते मात्र काहीच केले जात नाही. त्यामुळे समाजात याबाबत चीड निर्माण झाली असून धनगर समाजाला आरक्षण लागू न केल्यास येणाऱ्या निवडणुकीत सरकारला धडा शिकवण्याचे समाजाच्या वतीने ठरवले आहे, असे यावेळी कार्यकर्त्यांनी सांगितले.

# मला निवृत्त होऊ द्या...! -मनोहर जोशी

**मुंबई (सम्यक कासारे)-** गेली ५२ वर्षे मी शिवसेनेत आहे, माझं वय आता ८१ पूर्ण झालं आहे, त्यामुळे मला आता राजकारणातून निवृत्त होऊ द्या. माझा शिवसेनेचा राजीनामा स्वीकारा, अशा शब्दांत माजी मुख्यमंत्री व शिवसेनेचे नेते मनोहर जोशी यांनी आज उद्धव ठाकरे यांच्या समक्ष स्वतःची कैफियत मांडली. शिवाजी मंदिरमध्ये आज मनोहर जोशीलिखित पुस्तकाचे प्रकाशन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. मी सगळी पदे भूषवली, मला पाहिजे ते मिळालं. बाळासाहेबांनी जे प्रेम दिलं, तेच उद्धव ठाकरेंनी दिलं, त्यामुळे मी संतुष्ट आहे. आता नव्याने पुढे येत असलेल्या पिढीला संधी मिळायला हवी असे सांगत, आता आम्हाला प्रशासनाचा अनुभव नाही, आम्ही रस्त्यावरचे राजकारणी, अशी खंतही जोशी यांनी या वेळी व्यक्त केली. दरम्यान, नितीन गडकरी



अनुपस्थित राहिल्याबद्दल कोटी करताना जोशी म्हणाले, की नितीनजी या कार्यक्रमाला आले नाहीत, नकारात्मक मानसिकतेने हे सरकार आलेलं आहे. या वेळी उद्धव ठाकरे यांनी मनोहर जोशी यांच्या शिवसेनेतील निष्ठेचे आभार मानताना सरांसारख्या नेत्यांची निवृत्ती निव्वळ अशक्य आहे, अशा शब्दांत प्रत्युत्तर दिले. सरांनी राजकीय निवृत्ती घेण्यापेक्षा सतत राजकीय दिशा दाखवणारी पुस्तकं लिहीत राहावे, असा सल्ला त्यांनी दिला. त्याचवेळी शिर्डी संस्थानने राज्य सरकारला दिलेल्या ५०० कोटी रुपयांच्या सहकार्याचे उद्धव ठाकरे यांनी स्वागत केले. साईंचा खजिना राज्याच्या विकासासाठी खुला झाल्याने निळवंडेसारखा रखडलेला प्रकल्प होऊन लाखो शेतकऱ्यांचे जीवन सुखकारक होईल, अशा शब्दांत त्यांनी या निर्णयाचे स्वागत केले.

# मुलीच्या छेडछाडीचा बदला, शाळेजवळच केली १७ वर्षीय विद्यार्थ्याची हत्या

**लातूर (हर्षद परब)-** मुलीची छेड काढणाऱ्या १७ वर्षांच्या मुलाची नातेवाईकांनी हत्या केल्याची घटना लातूरमध्ये घडली आहे. सागर बालाजी मोमले असं हत्या करण्यात आलेल्या तरुणाचं नाव आहे. लातूरच्या रेणापूर तालुक्यातील तळणी इथं हा सर्व प्रकार घडला आहे.

सागर मोमले हा तरूण शाळेत जाणाऱ्या आपल्या मुलीची छेड काढत होता, असा आरोप संबंधित मुलीच्या नातेवाईकांचा होता. त्यानंतर या नातेवाईकांनी गावातील शाळेजवळ सागर मोमले याला बेदम मारहाण केली. या मारहाणीत सागरचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी चाकूर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दरम्यान, सागर मोमले हा आमच्या मुलीची छेड काढत आहे, अशी तक्रार नातेवाईकांनी चाकूर पोलीस ठाण्यात शुक्रवारी नोंदवली होती. पण तक्रार नोंदवल्यानंतर पीडित मुलीचे नातेवाईक शांत बसले नाहीत.

पीडित मुलीच्या नातेवाईकांनी रात्री ८ च्या



दरम्यान गावातीलच 'विद्या विकास' या शाळेजवळ सागर आला असता पीडित मुलीचे वडील, भाऊ, चुलते व इतर पाच जणांनी सागरला लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या सागरचा जागीच मृत्यू झाला आहे.

सागर मोमले या तरूणाने याआधीही अनेक तरूणींची छेड काढली आहे, असा आरोप मुलीच्या नातेवाईकांचा आहे. त्यावरूनच सागरवर ३५४ अन्वये गुन्हाही दाखल करण्यात आला होता. मात्र मुलीच्या नातेवाईकांनी कायदा हातात घेत सागराच खून केला. त्यामुळे आता मुलीच्या नातेवाईकांवरही गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# ९ महिन्याच्या गर्भवतीवर केला बलात्कार
# आरोपीला शेजारच्या महिलेनेही दिली साथ

**नागपूर (धनश्री सट्टा)-** मुख्यमंत्र्यांचं नागपूर पुन्हा एकदा बलात्काराच्या घटनेनं हादरलं आहे. नऊ महिन्याच्या गर्भवती महिलेवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भेंडे ले-आऊटमधील ही माणुसकीला काळीमा फासणारी ही घटना आहे. ९ महिन्याच्या गर्भवतीवर शेजाऱ्याने बलात्कार केला आहे. यात गर्भवती महिला ही २० वर्षांची होती. छोटू उर्फ मद्रासी मेश्राम असं आरोपीचं नाव आहे. छोटू हा पीडितेच्या घराशेजारी राहतो. सगळ्यात धक्कादायक म्हणजे शेजारी राहणाऱ्या मीराबाई या महिलेच्या घरी तिच्याच मदतीने आरोपीने गर्भवतीवर बलात्कार केला असल्याचं सांगण्यात येत आहे.

महिला गर्भवती होती. त्यामुळे तुझ्या पोटावर मी लाथ मारेन अशी धमकी देत आरोपीने महिलेवर बलात्कार केला. बरं इतकंच नाही तर पीडितेच्या पतीलाही जबर मारहाण केली. या घटनेचा बोबाटा



होताच आरोपीने पळ काढला पण पोलिसांनी त्याला अटक केली आहे. दरम्यान, महिलेच बाळ आणि महिला सुखरूप आहेत. तिच्यावर नजिकच्या स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहे. तर पोलीस आता या संपूर्ण प्रकरणात तपास करत आहेत. तर रविवारी असाच एक धक्कादायक प्रकार नागपुरात घडला. रेल्वे स्थानकावरून महिलेचं अपहरण करून बलात्कार केल्याची घटना घडली होती. पीडित महिला ही नोकरीसाठी त्रिपुराहून नागपूरमध्ये आली होती. नागपुरात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीत सातत्याने वाढ होत असताना हा प्रकार समोर आला.

महिला रेल्वे स्थानकावर एकटी असल्याचा फायदा घेत एका अज्ञात व्यक्तीनं या महिलेचं अपहण केलं आणि त्यानंतर तिच्यावर बलात्कार केला. याप्रकरणी पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पण अजूनही आरोपीचा शोध लागू शकला नाही.




## सौजन्य व्हॉट्सअप



# भाविकांच्या पैशावर सरकारचा घाला - अशोक चव्हाण

**मुंबई (अमोल गुडेकर)-** राज्य सरकारचे आर्थिक व्यवस्थापन पूर्णपणे बिघडले असून, भाजप-शिवसेना सरकारच्या काळात महाराष्ट्र राज्य कर्जबाजारी झाले आहे, हे आता स्पष्ट दिसते आहे. नगर जिल्ह्यातील निळवंडे सिंचन प्रकल्पासाठी शिर्डी संस्थानला भाविकांनी देणगी म्हणून दिलेल्या पैशावर राज्य सरकारने घाला घातला आहे. त्यामुळे 'कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा?' हा प्रश्न जनतेने सरकारला विचारण्याची वेळ आली आहे, अशी टीका कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार अशोक चव्हाण यांनी केली आहे.

या संदर्भात बोलताना चव्हाण म्हणाले, की राज्यातील प्रकल्प हे करदात्यांच्या पैशातून होत असतात. पण सरकारला



आर्थिक नियोजन नसल्याने केवळ ४ वर्षांत या भाजप-शिवसेना सरकारने राज्यावर पाच लाख कोटींपेक्षा जास्त कर्जाचा बोजा करून ठेवला आहे. पुरवणी मागण्यांचा तर जागतिक विक्रम या सरकारने केला आहे. महालेखापालांनीही या सरकारच्या आर्थिक गैरव्यवस्थापनावर ताशेरे ओढले आहेत. राज्य सरकार पेट्रोल, डिझेलवर दुष्काळी, तसेच हायवेवरील दारूची दुकाने बंद केली म्हणून सेस लावून जनतेचे कंबरडे मोडत आहे. सत्तेवर आल्यावर मोठमोठ्या वल्गना करून श्वेतपत्रिका काढणाऱ्या सरकारचे पितळ आता उघडे पडले आहे.

सिंचनाकरिता मागील सरकारने दिलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतांवर बोट ठेवणाऱ्या भाजपच्या सरकारने गेल्या तीन वर्षांत ६४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्तीच्या सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्या आहेत. 'जलयुक्त शिवार'मधील गैरव्यवहारदेखील पुढे आले आहेत. याचबरोबर वित्त आयोगाने महाराष्ट्रात सिंचन क्षमतेत काडीमात्र वाढ झाली नाही, असे सांगत या सरकारला आरसा दाखवला आहे.

त्यासोबतच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने दिलेल्या अहवालात महाराष्ट्रात जवळपास ३१ हजार गावांत भूजल पातळीत मोठी घट झाली आहे, हे स्पष्ट झाल्याचे चव्हाण यांनी स्पष्ट केले.



## संपादकीय..

संपादक:- राकेश शंकर गोरे

# सावध, पण मोठे पाऊल

मराठा आरक्षणाचा मार्ग अखेर मोकळा झाला. या आरक्षणासंदर्भातील विधेयक विधीमंडळाने गुरूवारी चर्चेविना एकमताने मंजूर केले. सकल मराठा समाजाच्या २० वर्षाच्या लढ्याचे हे यश आहे, म्हणूनच हा दिवस मराठा समाजासाठी ऐतिहासिक असाच ठरावा. या सामाजिक प्रश्नाचे कसे आणि किती राजकारण झाले हे साऱ्या महाराष्ट्राने पाहिले. मराठा समाजाला आरक्षण देण्याविषयी कुणाचेही दुमत नव्हते.

मागासवर्गीय आयोगाच्या पाहणीत देखील अन्य समाज घटकांपैकी कुणीही या आरक्षणाला विरोध केल्याचे निदर्शनास आले नाही. मात्र राजकीय पक्षांचा पाठिंबा असूनही ते कायदेशीर प्रक्रियेत अडकून पडले. राज्यात काँग्रेस आघाडीचे सरकार सत्तेवर असताना न्या. बापट आयोगाने मराठा समाजाला आरक्षण देता येणार नाही, असा निर्वाळा दिला. न्या. बापट आयोगाचा अहवाल देखील विधिमंडळात सादर करण्यात आला नव्हता. मराठा आरक्षणास स्थगिती देण्याच्या आदेशामध्ये मुख्य न्यायमूर्ती मोहित शहा व न्यायमूर्ती एम. एस. सोनक यांच्या खंडपीठाने हा मुद्दा विचारात घेतला होता. आताही राज्य सरकारने आयोगाचा अहवाल विधिमंडळात सादर न करता कृती अहवालातील शिफारशींच्या आधारे विधेयक मंजूर केले आहे.

तेव्हा आरक्षणास आव्हान देताना हा एक मुद्दा पुढे येऊ शकतो. 'तामिळनाडू पॅटर्न'चा प्रयोग करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. मात्र हे लक्षात घेतले पाहिजे की, सर्वोच्च न्यायालयाचे निर्बंध लागू होण्यापूर्वीच तामिळनाडूत ६९ टक्के आरक्षण लागू झालेले होते. महाराष्ट्रातील आरक्षण आता ६८ टक्क्यांवर पोहोचले आहे. तामिळनाडूप्रमाणेच कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणासह काही राज्यांचा ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण देण्याचा प्रयत्न आहे. परंतु जाट, गुजर समाजाचे आरक्षण कायदेशीर कचाट्यात अडकलेले आहे. तामिळनाडूमध्ये ओबीसींसाठी ३० टक्के, एमबीसी (अति मागास घटक) साठी २० आणि अनुसूचित जाती-जमातींसाठी १९ टक्के आरक्षण आहे. तेथे ओबीसी व एमबीसीअंतर्गत सर्व जाती समाविष्ट करून स्वतंत्र संवर्ग तयार केले आहेत. मात्र महाराष्ट्रात ओबीसींच्या विरोधामुळे केवळ मराठा समाजासाठी स्वतंत्र संवर्ग करून १६ टक्के आरक्षण दिले जाते आहे.

मागासवर्ग आयोगाच्या अहवालात नेमक्या शिफारशी काय आहेत, हे गुलदस्त्यात असले तरी इतर मागासवर्गाचे आरक्षण मिळवायला मराठा



समाज पात्र आहे, अशी शिफारस आयोगाने केली आहे, असे अनधिकृतपणे सांगणारेही आहेत. कदाचित त्यामुळेच हा अहवाल पटलावर ठेवला गेला नसावा. ती शिफारस खरी मानायची तर मराठा समाजाला केवळ ओबीसीचे प्रमाणपत्र देण्याचीच गरज होती. पण तसे करणे विद्यमान सरकारला परवडणारे नाही. ओबीसींच्या आरक्षणात त्यामुळे मोठा वाटा पडेल आणि ओबीसी नाराज होतील, ही भीती सरकारला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर हा धोका कोणीही पत्करणार नाही. म्हणूनच फडणवीस सरकारने सावधगिरीने टाकलेले हे मोठे पाऊल आहे, असेच म्हणावे लागेल.

गेल्या दोन दशकांपासून मराठा समाजाला आरक्षणाची मागणी होते आहे. पण या मागणीला खरी प्रखरता आणली ती राज्यभर शांततापूर्ण मार्गाने निघालेल्या मराठा क्रांती मोर्चांनी. त्या मोर्चांची सुरुवात औरंगाबादला झाली होती. या विधेयकाने त्या मोर्चांचा प्रवास तात्विक शेवटापर्यंत पोहोचला का, हा प्रश्नही या निमित्ताने विचारला पाहिजे. जोपर्यंत या विधेयकावर राज्यपालांची सही होत नाही तोपर्यंत तसा शेवट कोणी मानणार नाही तर कोणी प्रत्यक्षात आरक्षणाचा लाभ मिळेपर्यंत ती स्थिती आली हे स्वीकारणार नाही. पण या मोर्चांचा हा एक मोठा परिणाम म्हणून नक्कीच स्वीकारता येईल. त्यामुळे राज्यभर शांततापूर्णरित्या लाखोंचे मोर्चे काढणाऱ्या नेतृत्वाचेही या निमित्ताने अभिनंदन करायलाच हवे. हे आरक्षण न्यायालयात टिकेल का? हा आता मोठा प्रश्न सर्वांसमोर आहे. ते टिकेल असा विश्वास सरकारकडून व्यक्त केला जात असला तरी काळच खरे काय ते सांगेल. जातीनिहाय लोकसंख्येची मोजणी झालेली नाही, मागासवर्ग आयोगाची निर्मितीच वैधानिक नाही इथपासून अनेक मुद्दे समोर आणले जात आहेत. त्यांना काय उत्तर द्यायचे हे आता सरकारचे काम आहे. त्यासाठी न्यायालयात वकीलांची फौज उभी करण्याचीही घोषणा मंत्री विनोद तावडे यांनी केली आहे. पण त्यातून सरकारची इच्छाशक्ती फार तर दिसू शकेल. जास्त वकील उभे राहिले म्हणून खटला जिंकला असे होत नाही.

एक वकीलही महत्वाचे मुद्दे मांडण्यासाठी पुरेसा असू शकतो. एकूणच, मुख्यमंत्र्यांनी हा विषय आतापर्यंत तरी कौशल्याने हाताळला आहे. हे आरक्षण देताना पुरेशी काळजी घेतली आहे हे त्यांचे म्हणणे खरे ठरले आणि आरक्षण न्यायालयातही टिकले तर मराठा समाजाला जो काही आर्थिक, शैक्षणिक लाभ व्हायचा तो होईलच, पण मुख्यमंत्री फडणवीस यांना अधिक लाभ होईल, हे नक्की.

# 'जीडीपी'ची घसरण

मोदी सरकारचा कार्यकाळ पूर्ण होण्यास साधारण सहा महिने शिल्लक आहेत. त्यानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुका होतील. बरोबर साडेचार वर्षांपूर्वी देशाची 'बरबाद झालेली' अर्थव्यवस्था ६० महिन्यांत रुळावर आणू अशी गर्जना करीत मोदी सरकार बहुमताने सत्तेत आले. त्या वेळी मोदींचा प्रचार भ्रष्टाचार व आर्थिक अनागोंदी यांना केंद्रस्थानी धरून होता. अनेकांना त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाची भुरळ पडली होती. काहींना त्यांच्या हातात जादूची कांडी आहे, असे वाटू लागले. काहींना देशाचा कारभार एकहाती दिल्यास सगळे वठणीवर येतील. अर्थव्यवस्थेतून सोन्याचा धूर निघेल असे वाटत होते. पण आता साडेचार वर्षांचा एकूण कारभार आणि गेल्या तीन महिन्यांतले देशाचे आर्थिक वास्तव पाहता हे सरकार महागाई, रुपयाचे अवमूल्यन, इंधन दरवाढ, शेतमालाचे पडणारे भाव, दुष्काळ, रिअल इस्टेटमधील मंदी, वाढती वित्तीय तूट, सार्वजनिक बँकांचा एनपीए या आणि अशा अनेक आर्थिक समस्यांनी हैराण झालेले दिसते. तरीही मोदी सरकार आर्थिक आघाडीवर अपयश आल्याचे मानण्यास तयार नाही. पण गेल्या शुक्रवारी केंद्रीय सांख्यिकी कार्यालयाने गेल्या तिमाहीतील विकासदर (७.१ टक्के) जाहीर केला. हा विकासदर मागील तिमाहीच्या तुलनेत (८.२ टक्के) घसरल्याचे या आकडेवारीतून दिसून आले. सरकार पुन्हा तोंडघशी पडले. जीडीपी घसरण्याची महत्त्वाची कारणे अशी आहेत, गेल्या तिमाहीत शेतमालाचे भाव कमालीचे पडल्याने ग्रामीण भारतातील क्रयशक्ती कमी झाली. त्याचा परिणाम उत्पादन क्षेत्रावर झाला. ग्राहकोपयोगी वस्तूंची विक्री कमी झाली. त्याचबरोबर गेल्या वर्षी कृषी क्षेत्राचा विकासदर ५.३ टक्क्यांवर आला होता, तो या वेळी घसरून ३.८ टक्क्यांवर आला. शिवाय गृहबांधणी क्षेत्रातील वाढीचा दर गेल्या तिमाहीच्या तुलनेत ८.७ टक्क्यांवरून ७.८ टक्क्यांवर आला आहे. सोबत पेट्रोल-डिझेलच्या




वाढलेल्या किमती, रुपयाचे अवमूल्यन, जवळपास शून्यवत आलेली निर्यात, गुंतवणुकीत घट, सार्वजनिक बँकांचे आजारपण अशीही बरीच अन्य कारणे आहेत. जीडीपी घसरण्यात आणखी एक छोटेसे कारण आहे ते म्हणजे ज्या नव्या करदात्यांनी सरकारी तिजोरीत कर भरलेला होता, त्यातील बहुसंख्याक करदात्यांनी करपरतावा सरकारकडून वसूल केला हेदेखील आहे. म्हणजे जे सरकार नोटबंदीमुळे कर भरणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली असे छातीठोकपणे सांगत होते तो दावा पोकळ ठरला. एकुणात जीडीपी घसरणे व तोंडावर निवडणुका असणे अशा दुहेरी कोंडीत सरकार अडकले आहे.

## शब्दकोडे क्रमांक - ३६



**उभे शब्द**

१. पावसाचे दिवस २. प्राचीन ४. एकापाठोपाठ एक, जोरकसपणे ५. गार ६. विशेष ७. फाटलेल्या दुधाचा पदार्थ ८. रसाळ ९. घनिष्ट संबंध १०. जननी, आई ११. न्यूनता १३. पुष्पदल १६. मादीच्या विरुद्ध १८. कृष्णार्जुनाची जोडी २१. खर्चात कपात २४. तंबाखूचे सुगंधी चूर्ण २६. पावा २८. बडबड, त्रास २९. परिचय ३१. दरवाजा ३३. निखळ सौंदर्य ३४. वरण, आमटी वगैरे ३७. लक्ष्मीचे एक नाव ३८. फॅक्टरीला मराठी शब्द ४०. मध ४२. घन, घट्ट ४३. कुंभाराची भट्टी ४४. धाक, वचक ४६. थेट, सरळ ४९. नवरा ५०. लहान ५१. पोस्टद्वारे पैसे पाठवणे (इंग्रजी) ५३. ढग (सं.) ५४. यल्लमा देवीचे स्थान ५५. तोटी ५६. जून, निबर ५७. गुजराथी नृत्यप्रकार ५८. भेग, चीर ५९. शुभ्र, पांढरा स्वच्छ ६०. पोलीस, शेरीफ ६३. भ्रमर, भुंगा ६४. पाण्याचा गोठलेला प्रवाह ६५. अधिक महिना ६६. एक रंगीत कदमूळ ७०. एक पक्षी ७२. युवक, जवान ७३. उंटाच्या पाठीवरील उंचवटा ७७. बगळा

**आडवे शब्द**

१. भित्रा, कच खाणारा ३. मधुमक्षिका ६. मृत्तिकापात्र ९. समुद्रावरील पूर्ण भरतीची वेळ १२. तपासणी करणारा १४. वेल १५. सर्वस्व १७. पाठवणी १९. रान, वन २०. जनावरांची आरोळी २२. मादीच्या विरुद्ध २३. हिंदुस्थान २५. वडिलांचे मराठी संबोधन २७. उगीच २९. रांग ३०. ताप देणारे, त्रासदायक ३२. अंगरखा ३३. आरोप ३५. पोपट ३६. शासकीय ३९. गीतातील एक शब्दालंकार ४१. पहारेकरी ४३. नाविक दल ४४. मजबूत, भक्कम ४५. समाजातील वजन ४६. पोळ्या भाजण्याचे पात्र ४७. खाजणारा ४८. पोथीचे वाचन ५०. समोरासमोरची चकमक ५२. थोडक्यात राष्ट्रीय जनता दल, लालूप्रसाद यांचा पक्ष ५४. माता पिता ५९. हवाई अड्डा ६१. कचेरी (इंग्रेजी) ६२. ओलसर हवा ६४. बर्फाचा मोठा भाग ६५. चिखल उडू नये म्हणून वाहनांना लावलेले साधन (इंग्रेजी) ६७. अहंकार ६८. अधिक महिन्याचे नाव ६९. एक पाताळ ७१. अटीची भाषा ७३. दहावी रास ७४. पुष्कळ ७५. मांजर ७६.ऐटबाज ७७. असे श्वसन मन:शांतीसाठी फायद्याचे ७८. हावरटपणा ७९. मोठा हातोडा ८०. हात

## थोडक्यात महत्वाचे

### शाळांना १०० टक्के अनुदान द्या

***आमदार कपिल पाटील यांची मागणी***

**सोलापूर (किसन कदम)** - राज्यातील शिक्षकांची गुणवत्ता चांगली आहे. मात्र, शिक्षण विभागाच्या दुर्लक्षामुळे शिक्षणाची गुणवत्ता ढासळत चालली आहे. राज्यात विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान देण्याची आमची मागणी आहे; पण त्याबाबत सरकार खोटे बोलत असल्याचा आरोप शिक्षक आमदार कपिल पाटील यांनी केला.



आमदार पाटील म्हणाले, ''मूल्यांकनात पात्र ठरलेल्या शाळांना अनुदान देण्याबाबतचे वक्तव्य शिक्षणमंत्र्यांनी विधिमंडळात केले. खरेतर याबाबत सरकार खोटे बोलत आहे. राज्यात जेवढा भ्रष्टाचार होतो, त्यापेक्षा कितीतरी कमी पटीने पैसे शिक्षकांच्या पगारासाठी लागतील. शिक्षकांना देण्यासाठी पैसे भरपूर आहेत; पण पगार देण्याची सरकारची दानत नाही. शासनाने सुरू केलेले 'पवित्र' पोर्टल चांगले आहे; पण त्यापुढेही जाऊन शिक्षकांची भरती ही लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून करणे गरजेचे आहे. शासनाने कोणत्याही परिस्थितीत संस्थांकडे भरतीची प्रक्रिया देऊ नये.'' राज्यात एक लाख ९२ हजार डीएड, बीएडधारक आहेत, पण शासन भरती करत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

## सुडोकू क्रमांक - ३६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 3 | | | 2 | 8 | | |
| 8 | | | | 4 | 5 | 3 | 1 | 7 |
| 4 | | 5 | 3 | | 1 | | | |
| 9 | | | | | | 6 | | 1 |
| | 8 | | | | | | 3 | |
| 5 | | 1 | | | | | | 2 |
| | | | 9 | | 6 | 7 | | 3 |
| 2 | 5 | 9 | 4 | 7 | | | | 8 |
| | | 7 | 1 | | | 9 | 5 | |




व्यंगचित्र

**सुविचार** लक्षात ठेवा-आयुष्यात कुठलीच गोष्ट कायमची आपली नसते.

## साप्ताहिक राशिभविष्य

**मेष-** तुम्ही आपल्या मतांबद्दल अधिक ठाम राहणार आहात. तुमच्या व्यक्तीमत्वाचा इतरांवर प्रभाव राहील.

**वृषभ-** आगामी काळात आपल्या जिद्द व चिकाटीमध्ये वाढ होणार आहे. आपला आत्मविश्वास अधिक दृढ होणार आहे.

**मिथुन-** पैसे मिळणे या दृष्टीने दिवस चांगलाच आहे. काहींना अचानक धनलाभ संभवतो. संततीचे प्रश्न सोडवू शकाल.

**कर्क-** जिद्द व मनोबल वाढेल. आत्मविश्वासाने कार्यरत राहल. तुमच्या कार्यक्षेत्रात एखादी सुसंधी लाभेल. भाग्यकारक घटना घडेल.

**सिंह-** आजचा दिवस तसा सामान्यच म्हणावा लागेल. प्रवास आज नकोत. महत्वाची कामे, महत्वाचे निर्णय घेण्याचे टाळावे.

**कन्या-** आज आपण आपली अडलेली रखडलेली कामे मार्गी लावू शकाल. नव्या उत्साहाने व नव्या उमेदीने कामाला लागाल.

**तूळ-** आज आपण उतसाहाने व आनंदाने कामे कराल. तुम्ही अधिक आशावादी राहाल. तुमचा इतरांवर प्रभाव राहील.

**वृश्चिक-** प्रवासाचे योग आज येणार आहेत व ते सुखकर होतील. नातेवाईकांचे अपेक्षित सहकार्य लाभेल.

**धनु-** आजही दिवसभर तुमचा काम करण्याचा मूड असणार नाही. कामे टाळण्याकडे प्रवृत्ती राहील. निरुत्साह जाणवेल.

**मकर-** आपले व्यक्तीमत्व अधिक प्रभावी बनेल. आत्मविश्वास, जिद्द चिकाटी वाढेल. कामाची जबाबदारी स्वीकाराला.

**कुंभ-** मन प्रसन्न व आनंदी राहील. आरोग्य उत्तम लाभेल. व्यवसायात सुस्थिती राहील. नोकरीत तुमच्या शब्दाला मान दिला जाईल.

**मीन-** तुमच्या विचारांना आज योग्य दिशा मिळेल. बौद्धिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना दिवस विशेष चांगला जाणार आहे.


महाराष्ट्र शासन

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत पथक (सा.बां.) विभाग, यांचे कार्यालय

निविदा सूचना क्र. २४ सन २०१८-२०१९

https://mahatenders.gov.in

कार्यकारी अभियंता, एकात्मिकृत पथक (सा.बां.) विभाग, फोर्ट, मुंबई.

डीजीआयपीआर/२०१८-२०१९/४६०७


हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटींग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com, **Email-Info@maharashtracrimetimes.com** maharashtracrimetimes33301@gmail.com, **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# राज ठाकरे यांच्या भाषणानंतर उत्तर प्रदेश, बिहारमधील नेत्यांना मुंबई आणि महाराष्ट्रात प्रवेशबंदी

**मुंबई (विशाल कारंडे)- राज ठाकरे यांनी हिंदीतून आपल्या भाषणाला सुरुवात केली. यासंबंधी बोलताना त्यांनी सांगितल की, फक्त तुमचा प्रश्न असता तर मराठीत बोललो असतो. पण हे भाषण उत्तर प्रदेश, बिहारमधील लोक पाहणार आहेत असे सांगितल्याने हिंदीत बोलत आहे. उत्तर प्रदेशमधील लोकांमध्ये काही गैरसमज आहेत, काही आंदोलनं झाली, मारहाण झाली यावर काही प्रश्न आहेत. तुम्ही येऊन त्यांच्याशी बोललात तर बरं होईल अशी विनंती केल्यानेच मी आमंत्रण स्विकारल्याचा खुलासा त्यांनी केला.**




सत्य कटू असतं पण तुम्ही ते समजलं पाहिजे. मी शाळेत असल्यापासून माझं हिंदी चांगलं आहे. माझ्या वडिलांचं उर्दू चांगलं होतं, त्यांच्यामुळे माझं हिंदी चांगलं आहे. दुसरं कारण म्हणजे चित्रपट. हिंदी भाषा चांगली आहे त्यात दुमत नाही, पण ती राष्ट्रभाषा आहे हे चुकीचं. राष्ट्रभाषेचा निर्णय कधी झालेलाच नाही असं राज ठाकरेंनी यावेळी म्हटलं.

पहिल्यांदा आपण आपला देश समजला पाहिजे. आपल्या देशाची राज्यघटना, कायदा काय सांगतो हे समजलं पाहिजे, त्यामुळे इतर गोष्टी सहज होतील. या देशातील व्यक्ती कुठेही जाऊ शकतो, राहू शकतो असं म्हटलं जातं. पण आंतरराज्य कायदा कोणी वाचला आहे असं वाटत नाही. एक राज्य सोडून येता तेव्हा तुम्हाला पोलीस ठाण्यात जाऊन सर्व माहिती देणं गरजेचं असतं. एका राज्यातून आले आणि दुसऱ्या राज्यात गेले असं होत नाही. येथूनच खरी समस्या निर्माण होते असते.

रेल्वे आंदोलनासंबंधी बोलताना राज ठाकरेंनी सांगितलं की, रेल्वेच्या नोकरीची जाहिरात महाराष्ट्रातील एकाही वृत्तपत्रात आली नव्हती. सर्व जाहिराती उत्तर प्रदेश, बिहारमध्ये आल्या होत्या. आम्ही केंद्रीय मंत्र्यांशी पत्रव्यवहार केला होता. आमचे लोक भेटण्यासाठीही गेले होते. चर्चेसाठी आमचे लोक गेले ती भाषा ऐकून तुम्हीही खवळला असता. आमचे लोक काय हातावर हात ठेवून बसणार का ? उद्या मराठी लोकांनी उत्तर प्रदेशात जाऊन अशी भाषा वापरली तर तुम्ही आरती काढणार का ? असे सवाल राज ठाकरेंनी विचारले.

उत्तर प्रदेशातील लोक कमी पगारावर नोकरी करतात मराठी करतील का असा प्रश्न मला विचारण्यात आला आहे. चला मी दाखवतो तुम्हाला. मराठी लोक कायदेशीरपणे व्यवसाय करत आहेत. फेरीवाला आंदोलन झाल्यानंतर अनेक मराठी लोकही माझ्याकडे आले. त्यावेळीही वापरण्यात आलेली भाषा चुकीची होती. काही नेते भडकावण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोप राज ठाकरेंनी केला. महाराष्ट्रात इतके उद्योग का येत आहेत याचा विचार तुम्ही केला पाहिजे. उद्योग उत्तर प्रदेश, बिहारमध्ये गेले पाहिजेत असं मला वाटत आहे. पण तुम्ही सगळे इथे येतात. प्रत्येक राज्याची एक क्षमता असते, जर ती ओलांडली तर इथे राहणाऱ्यांनी काय करायचं. महाराष्ट्र पोलिसांना त्यांचा सर्वात जास्त वेळ कुठे जातो विचारा. जे गुन्हे होत आहेत त्यांचा तपास उत्तर प्रदेश, बिहार सीमारेषेवर सुरु आहे. इथे गुन्हा करतात आणि तिथे पळून जातात. १९९५ मध्ये महाराष्ट्रात एक स्कीम आली झोपडपट्टीवासियांना मोफत घरं....त्यानंतर परिस्थिती बदलली असं राज ठाकरे यावेळी बोलले.

जर अन्य राज्यातून गुन्हेगार येथे येणार असतील तर राज ठाकरे अजिबात सहन करणार नाही. बाहेरचे टॅक्सीवाले आमच्या आयाबहिणींची छेड काढतात, मग आम्ही गप्प बसायचे का? आमच्या आया बहिणी उघड्यावर पडलेल्या नाहीत अशा शब्दांत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उत्तर भारतीयांना त्यांच्याच मंचावरुन सुनावलं. तुम्ही प्रत्येक ठिकाणी जाऊन अपमानित होता असं वाटत नाही. तुमचा स्वाभिमान कुठे आहे....तुम्ही तुमच्या नेत्यांना प्रश्न का विचारत नाही अशी विचारणा राज ठाकरेंनी उपस्थितांना केली. उद्योगधंदे आणू न शकणारे उत्तर प्रदेशचे नेते अयशस्वी आहेत. जे पंतप्रधान झाले त्यातील ७० ते ८० टक्के उत्तर प्रदेशचे होते. तुम्ही जे प्रश्न आहेत ते त्यांना का विचारत नाहीत. पंतप्रधान पदासाठी मतदारसंघ चालतो मग रोजगार का मिळत नाही. याचं कोणाकडेही उत्तर नाही अशी टीका त्यांनी यावेळी केली.

## महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांच्याकडून 'प्रधानमंत्री उज्वल योजनेचा' महाराष्ट्रातील अंम्मलबजावणी बाबत संशोधन अहवाल सादर..



**मुंबई (योगेश होळंब)-** केंद्र सरकारने १ मे २०१६ रोजी संपूर्ण भारतात प्रधानमंत्री उज्वल योजनेचा शुभारंभ केला. 'स्वच्छ इंधन, बेहत्तर जीवन'असा नारा देत केंद्र शासनाने प्रधानमंत्री उज्वल योजना विविध माध्यामांद्वारे ग्रामीण भागात पोहचवली खरी पण ती किती प्रमाणात रुजली ह्याचा आढावा 'महाराष्ट्र राज्य महिला आयोग' यांच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनि घेतला. महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध असलेले 'महाराष्ट्र राज्य महिला आयोग' यांच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनि सरकारच्या 'प्रधानमंत्री उज्वल योजना' या योजनेचा संशोधन दौरा जानेवारी २०१८ ते मे २०१८ या ५ महिन्यांच्या कालावधित मराठवाड्यातील नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बिड या चार जिल्ह्यांमधल्या ४०० महिलांशी प्रत्यक्ष संवाद साधला आणि त्यातून त्यांना मीळालेली माहिती त्यांनी ३० नोव्हेंबर रोजी संशोधन अहवालाद्वारे सर्वांसमोर सादर केली.

प्रधानमंत्री उज्वल योजने अंतर्गत नांदेड, उस्मानाबाद, लातूर, बिड या चारही जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील महिलांना मोफत घरगुती एल. पी.जी. गॅस उपलब्ध करुन दिल्यामुळे महिलांच्या चेह-यावर हास्य फुलले आहे. त्यासोबतच त्यांच्या आरोग्याची काळजी घेतांना पर्यावरणाचा मोठया प्रमाणात ऱ्हास थांबविण्यात ही योजना यशस्वी ठरली आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत एल.पी.जी. सिलेंडर पोहचले. स्वयंपाकासाठी लागणाऱ्या घरगुती इंधनाच्या कष्टाला पर्याय मिळाल्याने महिलांची कष्टातुन सूटका झाली आहे . एल.पी.जी.मुळे वाचलेले कष्ट आणि वेळ यांचा उपयोग त्या इतर कामांसाठी करतात आणि त्यातून मोबदला मिळवून त्यांनी घराची आर्थिक प्रगती उंचावण्यासाठी त्यांची मदत होत असल्याने त्यांना खूप अभिमानास्पद वाटत आहे. एल. पी.जी. सारख्या स्वच्छ आणि तात्काळ उपलब्ध होणाऱ्या इंधनामुळे महिलांच्या आरोग्याच्या समस्या कमी झाल्या आहेत. तसेच सरपणासाठी वृक्षतोड, धूर - राख यातून प्रदुषण त्यामुळे होणारी तापमानातवाढ अशा स्थानिक पर्यावरणाचे प्रश्न याचि जाणीव महिलांना झाली आहे

एल.पी.जी. शेगडीचा अनूभव घेतलेल्या प्रत्येक महिलेला त्याचा वापर करण्याची इच्छा आहे मात्र सिलेंडरचा खर्च परवडत नसल्याने तसेच दरमहा बदलणारा सिलेंडरचा वाढता दर आणखी किती महागणार? अशा अनेक भीती अनेक महीलांच्या मनात आहेत. 'स्वच्छ इंधन, बेहतर जीवन' जगवणारी प्रधानमंत्री उज्वल योजने बरोबर स्वच्छ इंधनाचा वापर वाढवण्यासाठी, स्वतःचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी नेमके काय करायला हवे यासाठी शासनाने जनजागृती करावी. तसेच महिलांच्या हाताला काम देणाऱ्या योजना राबवाव्यात अशी शिफारस ही या संशोधन अहवालाद्वारे 'महाराष्ट्र राज्य महिला आयोग' यांच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनी शासनाला केली आहे.

## विजया बँकेचे एटीएम लुटण्याच्या प्रयत्नात असलेल्या तिघांना मुंबई कांदीवली पोलिसांनी केली अटक

मुंबईतील कांदिवली भागात लोखंडवाला परिसरात विजया बँकेचे एटीएम आहे. हे एटीएम लुटण्यासाठी आलेल्या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. तीन दिवस बँकांना सुट्टी होती त्यामुळे एटीएममध्ये रोख रक्कम जास्त असणार असा या चोरट्यांचा अंदाज होता. मात्र हा अंदाज सपशेल फसला. दोन दिवसांपासून हे आरोपी थांबले होते आणि एटीएमवर पाळत ठेवून होते. मात्र लुटीच्या प्रयत्नात असलेल्या तिघांना अटक करण्यात आली. या तिघांपैकी एकाला उत्तर प्रदेशातून पकडण्यात आले. तर दोघांना सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने पकडण्यात आले.

अँथोनी मनेजेस, शिवम मिश्रा आणि मोहम्मद मोजीम अशी या तिघांची नावं आहेत. या आरोपींकडून दोन रिव्हॉल्वर आणि एक अॅक्टीव्हा गाडीही पोलिसांनी जप्त केली. ही अॅक्टीव्हाही चोरीची असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.मुंबईतील कांदिवली पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

## गोहत्येच्या संशयावरून उद्रेक, दोन ठार

**बुलंदशहर (उत्तर प्रदेश) - गोहत्येच्या संशयावरून उत्तर प्रदेशातील बुलंदशहरात हिंसक आंदोलन सुरू आहे. आंदोलनकर्त्यांनी रस्त्यावर उतरून वाहनांची तोडफोड केली. पोलीस स्टेशनवर दगडफेक करीत हल्ला केला. पोलीस स्टेशनबाहेरील पोलिसांची गाडी पेटवून दिली. पोलीस स्टेशनवर केलेल्या गोळीबारात एका पोलीस निरीक्षकाचा आणि अन्य एकाचा मृत्यू झाला आहे.**



बुलंदशहरमधील एका गावात गोहत्या केल्याची अफवा पसरली. गोहत्येच्या संशयावरुन आंदोलनकर्त्यांनी रस्त्यावर उतरून हिंसक आंदोलन केले. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस आणि आंदोलनकर्त्यांमध्ये जोरदार चकमक झाली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांनी गोळीबार केला. यात एक तरुण जखमी झाला. तरुण जखमी झाल्याची बातमी पसरताच जमावानं पोलीस स्टेशनवर हल्ला केला. या हल्ल्यात पोलीस निरीक्षक सुबोध कुमार सिंह यांचा मृत्यू झाला. आंदोलनकर्त्यांनी हिंसक आंदोलन केले. पोलीस स्टेशनच्या बाहेर उभी असलेली पोलिसाची गाडी पेटवून दिली. पोलिसांवर दगडफेक केली. जमावामधून पोलीस स्टेशनवर गोळीबार केला. या गोळीबारात सुबोध कुमार सिंह यांचा मृत्यू झाला. बुलंदशहरमध्ये प्रचंड तणाव असून या ठिकाणी मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात

## दोन हजारांची लाच घेताना कोतवाल ताब्यात..

**महाड-** सात-बारावर वारसाची नोंद करण्यासाठी दोन हजार रुपयांची मागणी करणाऱ्या कोतवालास लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शनिवारी रंगेहाथ पकडले. यामुळे महाड महसूल कार्यालयातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा उघड झाला आहे. जगदीश लक्ष्मण साळवी असे कोतवालाचे नाव आहे. वडिलोपार्जित मिळकतीच्या सात-बारावर वारस नोंद करून देण्यासाठी त्याने तक्रारदाराकडे दोन हजार रुपयांची मागणी केली होती. त्यानंतर तक्रारदाराने या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती.

## ओळखपत्र दारवा आणि घ्या ५ किलोचा स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर

**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)-** ५ किलोचा स्वयंपाक गॅस सिलिंडरच्या किंमतीत कपात करण्यात आल्यानंतर सर्वसामान्यांना दिलासा मिळालाय. घरगुती अनुदानित गॅस (एलपीजी) सिलिंडर दरात ६ रुपये ५२ पैशांनी कपात करण्यात आलेय. तर विनाअनुदानित गॅस सिलिंडर दरात १३३ रुपयांनी स्वस्त करण्यात आलाय. एलपीजी सिलिंडरची किंमत सहा महिन्यांनंतर कमी केली गेली आहे. यापेक्षाही आनंदाची बातमी समोर येतेय. केवळ ओळखपत्र दाखवून तुम्हाला स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर मिळाला तर? हो. हे शक्य आहे. केवळ ओळखपत्र दाखवून ग्राहकांना ५ किलोचा स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर मिळण्याची प्रक्रीया पार पडणार आहे. यासाठी वाट पाहण्याची गरज लागणार नाही. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड (IOC) च्या ग्राहकांना हा लाभ मिळणार आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेडने केलेल्या ट्वीटनुसार, ग्राहकांना आपल्या शहरातील वितरक किंवा विक्री केंद्रावर या गॅस सिलेंडर तुम्ही खरेदी करु शकता. ओळखपत्र दाखवून ५ किलोचा स्वयंपाक गॅस सिलिंडर ते खरेदी करू शकतात. खूप मोठ्या प्रक्रियेतून जाण्याचा त्यांचा वेळ यामुळे वाचणार आहे.



## तेलंगणात शिवसेनेचा प्रचाराचा झंझावात, मतदारांचा उदंड प्रतिसाद

**मुंबई (प्रतिनिधी)-** तेलंगणामध्ये विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेनेने प्रचारात आघाडी घेतली असून सर्व ठिकाणी मतदारांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. तेलगंणा विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेनेकडून ४० ठिकाणी उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. ७ डिसेंबर रोजी मतदान होणार असून १८ डिसेंबर रोजी निकाल जाहीर होतील.

तेलंगणात ११९ जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी शिवसेना पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार उमेदवारांच्या प्रचारासाठी सध्या रॅली आणि जोरदार बैठका सुरू आहेत. ठिकठिकाणी काढण्यात येणाऱ्या या रॅलींना सर्वसामान्य नागरिकांसह तरुणांचाही मोठा प्रतिसाद मिळत आहे. येथील उप्पल विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेचे उमेदवार म्हणून जगदीशभाई चौधरी हे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. त्यांच्या प्रचारासाठी शिवसेना सचिव-खासदार अनिल देसाई यांच्या उपस्थितीत रविवारी हैदराबादमध्ये भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी प्रदेशाध्यक्ष टी. एन. मुरारी यांच्यासह हजारोंच्या संख्येने शिवसैनिक-पदाधिकारी उपस्थित होते.

## ब्राह्मण समाजाच्या आरक्षणाचा अहवाल मागासवर्ग आयोगाकडे पाठवणार

**मुंबई (सम्यक कासारे)–** मराठा आरक्षणाचा मार्ग मोकळा झाल्यानंतर आता ब्राह्मण समाजालाही आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी ब्राह्मण महासंघाचे आनंद दवे यांनी केली आहे. ब्राह्मण समाजाला जातीवर नव्हे तर आर्थिक निकषांवर आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. त्यामुळे गुजरातनंतर आता महाराष्ट्रातूनही ब्राह्मण आरक्षणाची मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनी ब्राह्मण आरक्षणाचा अहवाल मागासवर्ग आयोगाकडे पाठवणार असल्याचे सांगली येथे बोलताना सांगितले.



ग्रामीण भागात राहणारा ब्राह्मण समाज हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. त्यामुळे राज्य मागासवर्ग आयोगाने ब्राह्मण समाजाच्या आरक्षणाचा विचार करावा. त्यासाठी या समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचे सर्वेक्षण करावे, यामध्ये ब्राह्मण समाजाचे मागासपण सिद्ध झाल्यास त्यांनाही आरक्षण देण्यात यावे, अशी मागणी दवे यांनी केली आहे. दरम्यान, जो समाज आरक्षणाची मागणी करेल त्यांचा अहवाल आम्ही मागासवर्ग आयोगाकडे पाठवतो. त्यानुसार, ब्राह्मण समाजाच्या आरक्षणाचा अहवालही आम्ही आयोगाकडे पाठवू, असे चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिल्याबद्दल पाटील यांची सांगलीत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी ते बोलत होते. गुजरातमध्ये ब्राह्मण समाजाने आरक्षणाची मागणी केली आहे. येथे या समाजाची लोकसंख्या ९ टक्के इतकी आहे. त्यामुळे इथल्या ब्राह्मणांनी आपला ओबीसींमध्ये समावेश करण्यात यावा, या मागणीसाठी इतर मागासवर्ग आयोगाकडे धाव घेतली आहे.

## लवकरच राहुल गांधी लाल किल्ल्यावरुन तिरंगा फडकावतील



**हैदराबाद (प्रकाश पवार)-** काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी लवकरच लाल किल्ल्यावर ध्वजारोहण करताना दिसतील. कोणामध्ये हिंमत असेल तर त्यांना रोखून दाखवा, असे वक्तव्य काँग्रेसचे नेते नवज्योत सिंह सिद्धू यांनी केले. सिद्धू सध्या तेलंगणा विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी हैदराबादमध्ये आहेत. यावेळी एएनआय वृत्तसंस्थेशी बोलताना सिद्धू यांनी म्हटले की, मी राहुल गांधींचा सैनिक आहे. 'बुरे दिन जानेवाले है, राहुल गांधी आनेवाले है', हेच माझे घोषवाक्य आहे. लवकरच ते लाल किल्ल्यावरून तिरंगा फडकावतील, असा दावा सिद्धू यांनी केला. पाकिस्तानी लष्करप्रमुख जनरल कमर जावेद बाजवा यांची गळाभेट घेतल्याने सिद्धू यांच्यावर सध्या टीका होत आहे. या टीकाकारांचा समाचार घेताना सिद्धू यांनी म्हटले की, मी काही दिवसांपूर्वी पाकिस्तानमधून परतल्यानंतर कर्तारपूर मार्गिकेविषयी (कॉरिडोर) बोललो होतो तेव्हा अनेकांनी माझी खिल्ली उडवली होती.

मात्र, आज त्या लोकांना आपले शब्द मागे घ्यावे लागले आहेत. पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनी मला पाकिस्तानात जाऊ नको, असे सांगितले होते. मात्र, त्याचवेळी काँग्रेसच्या अन्य २० नेत्यांनी मला इम्रान खान यांच्या शपथविधीला जायला सांगितले. केंद्रीय नेतृत्वानेही मला परवानगी दिली होती. कॅ. अमरिंदर सिंह मला वडिलांप्रमाणे असले तरी मी पाकिस्तानात जाणार हे त्यांना आधीच स्पष्ट केले होते, असे सिद्धू यांनी सांगितले.

## भीमा-कोरेगाव; सरकार मागे घेणार ८६४ गुन्हे

**मुंबई (प्रतिनिधी)-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनामध्ये भीमा कोरेगाव व मराठा मोर्चा यावेळी विविध गुन्ह्यांसाठी एक हजारपेक्षा जास्त गुन्हे दाखल झाले होते. मात्र, पोलिसांवर झालेल्या हल्ल्यांसारखे



गंभीर गुन्हे वगळता अन्य शेकडो गुन्हे मागे घेतले जातील असे जाहीर केले. निष्कारण मराठा क्रांती मोर्चा व भीमा कोरेगाव प्रकरणी झालेला हिंसाचार यामध्ये हजारो तरूणांना गोवण्यात आल्याचे आरोप करण्यात आले होते. तसेच यामुळे अनेक तरूणांचे भवितव्य धोक्यात येऊ शकते अशी भीती व्यक्त करत हे गुन्हे मागे घेण्याची मागणी करण्यात आली होती. यावर मुख्यमंत्री फडणवीसांनी सकारात्मक प्रतिसाद देताना या संदर्भातील संपूर्ण आकडेवारीच जाहीर केली व शेकडो गुन्हे मागे घेण्यात येत असल्याचे घोषित केले.

## पॉर्नमुळे वहिनी आणि पुतणीची हत्या, मृतदेहावरही केला बलात्कार

**नागपूर (दिलीप दातार)-** पोर्न साईट्सच्या आहारी जाऊन कामवासनेत आकंठ बुडालेल्या एका तरुणाने आपली २८ वर्षाची वहिनी आणि चार वर्षाच्या चिमुकल्या पुतणीचा खून करून त्यांच्या मृतदेहावर बलात्कार केल्याची खळबळजनक घटना नागपुरात घडल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. नागपूरच्या वाडी पोलीस ठाणे हद्दीतील वडधामनानजीकच्या सुराबर्डी तकीया येथे ही घटना घडली. चंद्रशेखर बिंद असे २६ वर्षीय आरोपी तरुणाचे नाव असून, पोलिसांनी त्याला अटक केली आहे. पोर्न साईट्सच्या आहारी जाऊन कामोत्तोजनेतून हे कृत्य केल्याचा कबुली आरोपी चंद्रशेखर बिंदने दिली आहे.

मृत महिलेचा पती हा ट्रक चालक असून तो मूळचा उत्तर प्रदेशातील भदोई येथील रहिवासी आहे. काही वर्षांपासून रोजगारासाठी नागपूरात आला होता. २६ नोव्हेंबर रोजी तो ट्रक घेऊन जालन्याला रवाना झाला. पत्नी आणि मुलगी दोघे एकटेच घरी होते. चंद्रशेखर हा इंदोऱ्याला राहतो. त्याने डीफार्म केले असून शिक्षण पूर्ण करून तो एका औषधीच्या दुकानात कामाला आहे.

तो आपल्या एका मित्रासोबत भाड्याच्या खोलीत वेगळा राहतो. आरोपी चंद्रशेखरला पोर्न फिल्म पाहण्याचे व्यसन आहे. त्यामुळे शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याची इच्छा त्याच्या मनात सातत्याने येत होती. तो आपल्या मोठ्या भावाच्या घरीही येत-जात असायचा.



यादरम्यान त्याची आपल्या वहिनीवर नजर गेली. भाऊ बाहेर गेल्याचं त्याला माहित होतं. त्यामुळे आपली कामवासना शमविण्यासाठी तो बुधवारी दुपारी आला आणि वहिनीसोबत बोलू लागला. त्याने वहिनीला मोबाईल मागितला. मोबाईल देताच त्याने बळजबरी सुरू केली. तिने विरोध करताच संतापून त्याने तिचा गळा आवळून खून केला. खून केल्यावर नराधमाने वहिनीच्या मृतदेहावरच बलात्कार केला. चंद्रशेखरला संशय होता की त्याची चार वर्षाची पुतणी त्याला ओळखते. ती आपला भेद उघडकीस आणू शकते. म्हणून त्या नराधमाने चार वर्षाच्या चिमुकली पुतणीचाही खून केला आणि तिच्या मृतदेहावरही पाशवी अत्याचार केला.

हे दुष्कर्म केल्यानंतर तो तेथून फरार झाला. शेजाऱ्यांची मायलेकीची कुठलीही हालचाल किंवा आवाजही येत नसल्याने त्यांनी घरात जाऊन पाहिलं तेव्हा आईचा मृतदेह पलंगावर तर चिमुकलीचा मृतदेह जमिनीवर पडून होता.

## दोन हजाराच्या नवीन नोटा चलनातून रद्द होणार?



**ठाणे (तृप्ती गोरे)-** देशात दोन हजाराच्या चलनाची संख्या व्यवहारातून कमी होत आहे. त्यात दोन हजारांच्या नोटांची छपाई पूर्णतः थांबविल्याने दोन हजारांच्या नोटा बंद होतील की काय? याबाबत नागरिकांमध्ये चर्चा जोर धरू लागलीय. त्यात दोन हजारांच्या कोट्यवधी बनावट नोटा विविध राज्यात पोलिसांच्या छाप्यात सापडत आहेत. या नोटांचे चुकीचे रंग, उडणारे पुसट रंग आणि नोटा छापण्यातही मोठ्या चुका होत्या. एका चॅनेलने रंगातील फोलपणा उघड केला होता. देशाचं सर्वात महागडं चलन नाशिकच्या करन्सी नोट प्रेसमध्ये न छापता आरबीआयच्या नवीन प्रेसमध्ये छापण्यात आलं. याबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आलं होतं. त्यामुळे नोटा न छापण्या मागची कारणे काय काय हे सरकारनं स्पष्ट करणं गरजेचं आहे.